खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे

## प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष : २०२५ – २६

### साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमाला : मा. चेतनानंद महाराज

पुण्य नगरी

## जगण्यातला आनंद शोधला पाहिजे : डॉ. चेतनानंद महाराज

**राजगुरुनगर : प्रतिनिधी**

जीवन अमूल्य असून, ते पुन्हा मिळणार नाही. त्याचा सदुपयोग करा. आपला जन्म कशासाठी झाला, त्या मागचा उद्देश समजून घेऊन जीवनातला आनंद शोधा, असे प्रतिपादन आध्यात्मिक गुरू व वक्ते डॉ. चेतनानंद महाराज यांनी केले. ते खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत 'जीवनाला वन्समोअर नाही' या विषयावर बोलत होते. या प्रसंगी संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, संचालक बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, सुशील शिंगवी, व्याख्यानमाला समिती अध्यक्ष ॲड. राजमाला बुट्टेपाटील, प्राचार्य डॉ. एस.एस.पिंगळे, डॉ. एस.एस.जगताप, उपप्राचार्य प्रा.



व्ही.बी.दौंडकर, प्रबंधक एन.एम. शिंदे उपस्थित होते.

चेतनानंद महाराज पुढे म्हणाले की, चारित्र्य, ज्ञान, आत्मशक्ती असणाऱ्यांनाच जगात किंमत आहे.

सुंदरतेला चारित्र्याची जोड हवी. सावित्रीबाई फुले राजमाता जिजाऊ, अहिल्याबाई होळकर अशा कर्तबगार महिलांचे कर्तृत्व ही त्यांची सुंदरता होती.

जगणे हे वेदनेचे दुसरे नाव असून वेदनेचा तिरस्कार करू नका प्रेम करा त्यासाठी चारित्र्य महत्त्वाचे आहे. दिसण्यापेक्षा चारित्र्य आणि माहितीपेक्षा ज्ञान महत्त्वाचे असल्याचेही त्यांनी सांगितले. ज्या क्षेत्रात तुम्ही काम करता, त्या क्षेत्राला तुमची गरज वाटली पाहिजे यासाठी आपले मूल्य वाढवा. उत्तमतेचा ध्यास घ्या. अंतःकरणात कृतज्ञता ठेवणारी माणसे आनंदी असतात. आई-वडिलांना आपल्या वागण्याचा आनंद, समाधान मिळेल अशा पद्धतीने जीवन जागा. सध्याच्या काळात हवा पाणी अन्न आणि सामाजिक मानसिकता खराब होत चालली असून आपल्या सर्वांची जबाबदारी वाढलेली आहे. समर्पण भावनेने काम करून स्वतःला सिद्ध करा, असे आवाहन त्यांनी केले.

सूत्रसंचालन प्रा. मनीषा साबळे, परिचय प्रा. मयुरी राक्षे, तर आभार कार्तिकी शेंडगे हिने मानले.

Pimpri Chinchwad Edition
Feb 02, 2026 Page No. 02
Powered by: erelego.com

पुढारी

# जीवन अमूल्य; जगण्यातील आनंद शोधा !

■ डॉ. चेतनानंद महाराजांचा जीवनविषयक उपदेश



व्याख्यानमालेत बोलताना डॉ. चेतनानंद महाराज. समोर उपस्थित श्रोतावर्ग.

**राजगुरुनगर : पुढारी वृत्तसेवा**

जीवन अमूल्य असून ते पुन्हा मिळणार नाही; त्याचा सदुपयोग करा आणि जन्माचा उद्देश समजून जीवनातील संतोष व आनंद शोधा, असे प्रतिपादन आध्यात्मिक गुरू व वक्ते डॉ. चेतनानंद महाराज यांनी केले.

खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ यांच्या वतीने हुतात्मा राजगुरू महाविद्यालय येथे आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत (दि. ३१) 'जीवनाला वन्समोअर नाही' या विषयावर ते बोलत होते. या प्रसंगी संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, संचालक बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, सुशील शिंगवी, व्याख्यानमाला समिती अध्यक्ष ॲड. राजमाला बुट्टेपाटील, प्राचार्य डॉ. एस. एस. पिंगळे, डॉ. एस. एस. जगताप, उपप्राचार्य प्रा. व्ही. बी. दौंडकर, प्रबंधक एन. एम. शिंदे उपस्थित होते. डॉ. चेतनानंद महाराज म्हणाले, की चारित्र्य, ज्ञान आणि आत्मशक्ती असलेल्यांनाच जगात खरे मूल्य आहे. सुंदरतेला चारित्र्याची जोड असावी; सावित्रीबाई फुले, राजमाता जिजाऊ आणि अहिल्याबाई होळकर यांसारख्या कर्तबगार महिलांचे कर्तृत्व ही त्यांची खरी सुंदरता होती.

सध्याच्या काळात हवा, पाणी, अन्न आणि सामाजिक मानसिकतेची जबाबदारी वाढली आहे, म्हणून समर्पण भावनेने काम करून स्वतःला सिद्ध करा, असे आवाहन त्यांनी केले. प्रा. मनीषा साबळे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. मयुरी राक्षे यांनी परिचय करून दिला. तर, कार्तिकी शेंडगे हिने आभार मानले.

My Pune Gramin Edition
Feb 03, 2026 Page No. 7
Powered by: erelego.com

# जीवनातला आनंद शोधा : डॉ. चेतनानंद महाराज



**राजगुरुनगर : हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत 'जीवनाला वन्समोअर नाही' या विषयावर विचार व्यक्त करताना डॉ. चेतनानंद महाराज.**

**राजगुरूनगर :** जीवन अमूल्य असून ते पुन्हा मिळणार नाही. त्याचा सदुपयोग करा. आपला जन्म कशासाठी झाला, त्या मागचा उद्देश समजून घेऊन जीवनातला आनंद शोधा, असे आवाहन आध्यात्मिक गुरू व वक्ते डॉ. चेतनानंद महाराज यांनी केले.

ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत 'जीवनाला वन्समोअर नाही' या विषयावर बोलत होते. याप्रसंगी संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, संचालक बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, सुशील शिंगवी, व्याख्यानमाला समिती अध्यक्ष ॲड. राजमाला बुट्टेपाटील, प्राचार्य डॉ. एस. एस. पिंगळे उपस्थित होते.

चेतनानंद महाराज म्हणाले की, चारित्र्य, ज्ञान, आत्मशक्ती असणाऱ्यांनाच जगात किंमत आहे. सुंदरतेला चारित्र्याची जोड हवी. सावित्रीबाई फुले राजमाता जिजाऊ, अहिल्याबाई होळकर अशा कर्तबगार महिलांचे कर्तृत्व ही त्यांची सुंदरता होती. जगणे हे वेदनेचे दुसरे नाव असून वेदनेचा तिरस्कार करू नका प्रेम करा. त्यासाठी चारित्र्य महत्त्वाचे आहे. दिसण्यापेक्षा चारित्र्य आणि माहितीपेक्षा ज्ञान महत्त्वाचे असल्याचेही त्यांनी सांगितले. ज्या क्षेत्रात तुम्ही काम करता, त्या क्षेत्राला तुमची गरज वाटली पाहिजे.

यासाठी आपले मूल्य वाढवा. उत्तमतेचा ध्यास घ्या. अंतःकरणात कृतज्ञता ठेवणारी माणसे आनंदी असतात. आई-वडिलांना आपल्या वागण्याचा आनंद, समाधान मिळेल अशा पद्धतीने जीवन जागा. सध्याच्या काळात हवा पाणी अन्न आणि सामाजिक मानसिकता खराब होत चालले असून आपल्या सर्वांची जबाबदारी वाढलेली आहे. समर्पण भावनेने काम करून स्वतःला सिद्ध करा, असेही त्यांनी सांगितले.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख